महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत सामाजिक वनीकरण तसेच वन विभागामार्फत घेण्यात येणाऱ्या रोपवाटिका, रोपवन, मृद - जलसंधारण इत्यादी कामांतर्गत हजेरीपत्रके निर्गमित करणे, भरणे, पारित करणे, आणि कुशल / अकुशल बाबींचे भूगतान करण्याचे अधिकार वन विभागास प्रदान करण्याबाबत....

**महाराष्ट्र शासन**
**नियोजन विभाग (रोहयो प्रभाग)**
**शासन निर्णय क्र. मग्रारो-२०१६/प्र.क्र.१०२/मग्रारो-१**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई -४०० ०३२
दिनांक :-१२ एप्रिल, २०१८

**वाचा :-**

| | | |
|---|---|---|
| १ | शासन परिपत्रक क्र. मग्रारोहयो - २०११ / प्र. क्र. ८४ / रोहयो -१, | दिनांक ०१ नोव्हेंबर,२०११ |
| २ | शासन निर्णय क्र. मग्रारो - २०११ / प्र. क्र. ८० / रोहयो -१, | दिनांक ०९ डिसेंबर, २०११ |
| ३ | शासन निर्णय क्र. मग्रारो - २०११ / प्र. क्र. १३० / रोहयो - १० अ, | दिनांक २८ डिसेंबर, २०११ |
| ४ | शासन निर्णय क्र. मग्रारो - २०१३ / प्र. क्र. ६३ / रोहयो -१, | दिनांक ०८ जानेवारी, २०१३ |
| ५ | केंद्र शासनाचे मास्टर सर्क्यूलर ( २०१६ -२०१७), | दिनांक ०१ एप्रिल, २०१६ |
| ६ | शासन निर्णय क्र. मग्रारो -२०१६ / प्र. क्र. १०२ / मग्रारो - १ | दिनांक २९ सप्टेंबर, २०१६ |

**प्रस्तावना** :-

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत वन विभागामार्फत तयार करण्यात येणाऱ्या रोपवाटिका, वनीकरणाची कामे तसेच मृद व जलसंधारणार्थ कामे, इ. कामांसाठी हजेरीपत्रके निर्गमित करणे, भरणे, पारित करणे, कामांच्या कुशल / अकुशल बाबींचे भूगतान करण्याचे अधिकार वन विभागास दिनांक ३१ मार्च, २०१८ पर्यंत देण्यात आले होते. सदर प्रदान करण्यात करण्यात आलेल्या अधिकारास मुदतवाढ देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यास अनुसरून शासन खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

**शासन निर्णय** :-

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत वन विभागामार्फत तयार करण्यात येणाऱ्या रोपवाटिका, वनीकरणाची कामे तसेच मृद व जलसंधारणार्थ कामे, इ. कामांसाठी हजेरीपत्रके निर्गमित करणे, भरणे, पारित करणे, कामांच्या कुशल / अकुशल बाबींचे भूगतान करण्याचे वन विभागास प्रदान केलेल्या अधिकारास दि. ३१ मार्च, २०२० पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे. तसेच यासंदर्भातील मार्गदर्शक सूचना शासन निर्णय क्रमांक मग्रारो-२०१६/ प्र.क्र.१०२/ मग्रारो-१, दि.२९ सप्टेंबर, २०१६ प्रमाणेच राहतील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक क्र. २०१८०४१३१२१७१८३५१६ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

DAWALE EKNATH RAJARAM

Digitally signed by DAWALE EKNATH RAJARAM
DN: c=IN, o=DAWALE EKNATH RAJARAM, 2.5.4.20=499dd4df91587ffef1e20a2ee9e560dd0777e49ff6cfc838f362fdbb58c58e7b, ou=ALL INDIA SERVICR,CID - 4317051, postalCode=443106, st=Maharashtra, cn=DAWALE EKNATH RAJARAM
Date: 2018.04.13 12:20:28 +05'30'

**( एकनाथ डवले )**

**सचिव (रोहयो)**

**प्रत :-**

१) मा. राज्यपालांचे सचिव
२) मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव
३) सर्व मा. मंत्री व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४) मा. मुख्य सचिवांचे स्वीय सहायक
५) शासनाचे सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, मंत्रालय, मुंबई
६) संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय
७) महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई
८) महालेखापाल -१ (लेखा परीक्षा),महाराष्ट्र राज्य, मुंबई
९) महालेखापाल-२ (लेखा परीक्षा), महाराष्ट्र राज्य, नागपूर
१०) महालेखापाल-१ (लेखा अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य, मुंबई
११) महालेखापाल-१ (लेखा अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य, नागपूर
१२) सर्व विभागीय आयुक्त
१३) आयुक्त, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना-महाराष्ट्र, नागपूर
१४) सर्व जिल्हाधिकारी
१५) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
१६) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर
१७) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर
१८) प्रधान मुख्य वनसंरक्षक (उत्पादन व व्यवस्थापन), महाराष्ट्र राज्य, नागपूर
१९) प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा महासंचालक, सामाजिक वनीकरण, महाराष्ट्र राज्य, नागपूर
२०) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र वन विकास महामंडळ, नागपूर
२१) सर्व अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक
२२) संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई
२३) सर्व मुख्य वनसंरक्षक
२४) सर्व उपवनसंरक्षक
२५) वन विभाग, मंत्रालय, मुंबई येथील सर्व कार्यासने
२६) निवड नस्ती (मग्रारो-१).